गोविंदा या मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास (खेळास) साहसी खेळाचा दर्जा देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : विकाक-२८१५/प्र.क्र.८/क्रीयुसे १,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ ऑगस्ट, २०१५.

**वाचा:-** १. शासन निर्णय समक्रमांक दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५
२. क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.क्रीयुसे/क्रीडाधोरण/२०१२-१३/का.६/४१८०, दि.३१.०७.१५ चे पत्र
३. क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.क्रीयुसे/क्रीडाधोरण/२०१२-१३/का.६/४३५२, दि.७.०८.१५ चे पत्र

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ या अंतर्गत राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देण्याच्या मुद्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यानुसार त्या अंतर्गत महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना करणे, साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे, साहसी खेळांच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन, साहसी क्रीडा पुरस्कार देणे, साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्था व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे इ.विविध बाबींचा अंतर्भाव आहे. साहसी क्रीडा प्रकारातील ट्रेकिंग, माऊंटनिअरिंग, स्किईंग, स्नोबोर्डींग, पॅरासेलींग, हॅडग्लायडींग, पॅराग्लायडींग, जलक्रीडा इत्यादि आयोजित करणाऱ्या संस्थांसाठी सुधारित नियम व मार्गदर्शक सूचना देण्यासाठी या विभागाच्या न्यायप्र-२१९४/प्र.क्र.१०५/क्रीयुसे-१, दि.२० एप्रिल, २०१५ अन्वये आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

गोकुळाष्टमी म्हणजेच दहीहंडी हा उत्सव महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा एक महत्वाचा सण आहे. सदर उत्सव राज्यामध्ये मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत असून यामध्ये युवक / युवतींचा मोठया प्रमाणात सहभाग असतो. दहीहंडी फोडण्यासाठी रचण्यात येणारे मानवी मनोरे हे चित्तथरारक असतात. या मनो-यांच्या माध्यमातून संघभावना, साहस, जिद्द, चिकाटी, शारीरिक क्षमता या भावना वाढीस लागतात. हा क्रीडा प्रकार असून तो एक दिवसाच्या उत्सवापुरता मर्यादीत न रहाता १२ महिने कधीही खेळता येईल या दृष्टीने साहसी खेळाचा दर्जा देऊन त्याचा समावेश साहसी क्रीडा प्रकारामध्ये करण्याबाबत शासनाकडे वेळोवेळी विविध स्तरावरुन मागणी करण्यात येत होती. त्या अनुषंगाने या संदर्भात पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारशी करण्याकरीता ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने गोविंदा या खेळास साहसी खेळ प्रकार म्हणून मान्यता देण्याबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्र क्र. ३ अन्वये शिफारस करण्यात आली होती. त्याप्रमाणे गोविंदा या मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास (खेळास) साहसी खेळाचा दर्जा देण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमिवर गोविंदा या मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास (खेळास) साहसी क्रीडा प्रकाराचा दर्जा देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. राज्यातील युवांना साहसी क्रीडा क्षेत्रातील संधी उपलब्ध करून देणे, या माध्यमातून त्यांचे अंगी असलेल्या क्रीडागुणांचे संवर्धन करणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गोविंदा खेळाच्या आयोजनाच्या प्रसंगी सुरक्षतेच्या दृष्टीने घ्यावयाच्या काळजी संदर्भातील मार्गदर्शक सूचना सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचे पालन सर्व संबंधितांनी कटाक्षाने करणे आवश्यक राहील. तसेच गोविंदा या खेळाच्या आयोजनाबाबतची विस्तृत नियमावली राज्य संघटनेने प्राथम्याने तयार करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८१३१४५८५८१६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae398dc3198690b46b6cf9b227ff99cbbfa40f24b5beeb33a668bc465f937400, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2015.08.13 15:02:29 +05'30'

**( सु.न.जोशी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत ,**

१. ॲड.आशिष शेलार, वि.स.स., ६०२, हायलँड कोर्ट, सी विंग, बाझार रोड, वांद्रा (प.) , मुंबई ४०० ०५१. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)
२. श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स.,बी-१/बी-२, विहंग गार्डन, रेमंड कंपनीसमोर,विहंगधाम क्लबजवळ,पोखरण रोड नं.१ ठाणे (प.) ४०० ६०६ (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)
३. श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स.,सी-१०,११ विश्वजित सोसायटी, वीर सावरकर पथ, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)
४. अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.आयुक्त,बृहन्मुंबई / ठाणे महानगरपालिका.
११.महासंचालक, पोलीस, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१२.पोलीस आयुक्त,मुंबई /ठाणे.

१३.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.

१४.श्री.अनंत विनायक सावंत, शिंफोणी को.ऑ.हौ.सो.लि.,प्लॉट नं.५०१, गणेशनगर, मालाड मार्वे रोड,चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ४०० ०६७. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)

१५.श्री.अरुण मधुकर बागकर, बी.आय.टी.चाळ नं.४, रुम नं.३३-३४, पहिला मजला,माझगांव,सेंट मेरी रोड,मुंबई ४०० ०१०. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)

१६. श्री.जगदीश तुकाराम साळवी, बी.आय.टी.चाळ नं.७, रुम नं.४७, दुसरा मजला, माझगांव, सेंट मेरी रोड, मुंबई ४०० ०१०. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)

१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१८. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.

१९. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.

२०.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)

२१.मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२२.अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, पुणे. (क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत पत्राने)

२३. अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे -३)

२४.निवडनस्ती, क्रीयुसे-१.

## परिशिष्ट

## गोविंदा खेळाच्या आयोजना प्रसंगी सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या काळजीसंदर्भातील मार्गदर्शक सूचना.

१. गोविंदा या खेळाचे आयोजनाबाबतची नियमावली राज्य संघटनेने तयार करावी. त्यानुसार सदर खेळाच्या नियमांचे पालन करणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

२. सदर स्पर्धेचे आयोजन या खेळाच्या राज्य संघटनेने ठरवून दिलल्या नियमावली प्रमाणे व दिलेल्या वेळापत्रकानुसार करणे बंधनकारक राहील.

३. राज्य संघटनेने स्पर्धा आयोजनाबाबतचे वेळापत्रक दरवर्षी जुलै महिना अखेर जाहीर करावे.

४. सदर स्पर्धचे आयोजन करीत असताना सहभागी स्पर्धकांनी सुरक्षतेच्या दृष्टीने वापरावयाची प्रमाणीत साधने व उपाय योजना याबाबतची यादी (चेस्टगार्ड, (टॉपरसाठी) हेल्मेट, सेफ्टीबेल्ट, सेफ्टीहारनेस इत्यादी.) राज्य संघटनेने जाहीर करावी.

५. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूचा वैयक्तिक विमा संबंधित क्रीडा संघटनाने काढण्यात आलेला असल्याबाबतचे हमीपत्र संबंधित संघ व्यवस्थापनाने देणे आवश्यक राहील. तसेच स्पर्धेचा विमा संबंधित स्पर्धा आयोजकांनी काढणे बंधनकारक राहील. तसेच स्पर्धेत सहभागी होण्यापुर्वी विम्याची कागदपत्रे सादर करावी लागतील.

६. प्रत्येक संघ व्यवस्थापनाने सहभागी खेळाडूंची स्वतःच्या जबाबदारीवर सदर स्पर्धेत सहभागी होत असल्याबाबतची हमीपत्रे आयोजन समितीस स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच १२ ते १५ वर्ष वयोगटापर्यंतच्या खेळाडूंसाठी चौथा व त्या वरील थरावर उभे रहावयाचे असल्यास त्याबाबत पालकांची लेखी परवानगी संघ व्यवस्थापकाकडे असणे आवश्यक राहील. तर १२ वर्षाखालील मुलांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

७. सदर स्पर्धा आयोजकांनी तातडीचे वैद्यकीय पथक, मॅट, पाण्याची व्यवस्था, मोबाईल टॉयलेट व्हॅन, पोलीस बंदोबस्त, स्पर्धेसाठी योग्य व मुबलक जागा आणि तद्नुषंगाने सुरक्षाव्यवस्थेचे आयोजन करणे आवश्यक राहील. तसेच स्पर्धेसाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या जसे स्पर्धा ज्याठिकाणी घेण्यात येणार आहे त्या जागेची परवानगी, अग्निशमनदल, पोलीस व वाहतुक पोलीस व परिवहन खात्याची परवानगी इत्यादी घेणे आवश्यक राहतील.

**********